राष्ट्रीय असांसर्गिक रोग जनजागृती उपक्रम
कृती नियोजन -सन २०१६-१७ अंतर्गत
प्रसिध्दी व जनजागृती उपक्रमास प्रशासकीय
मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः आयईसी २०१७/प्र.क्र. २५३ /आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ३० नोव्हेंबर, २०१७.

वाचा :

१) उपसंचालक, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,पुणे यांचे पत्र क्रमांक- उसंआसे/राआशिवसंवि/पीआयपी १७-१८/NCD/प्रकक्ष/१७, दिनांक ०९.११.२०१७.

शासन निर्णय:

राष्ट्रीय असांसर्गिक रोग जनजागृती उपक्रम कृती नियोजन - सन २०१६-१७ अंतर्गत प्रसिध्दी व जनजागृती उपक्रमास आणि त्यासाठी आवश्यक अनुदान खर्च करण्यास त्याखाली नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून याव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	उपक्रम	तपशिल	अपेक्षित खर्च (लाख/रुपये)
१	राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह रोग, ह्दयरोग व पक्षाघात प्रतिबंधक नियंत्रण कार्यक्रम (NPPCDS) विषयी एसटी महामंडळाच्या बसेसवर कुटुंब नियोजन विषयी संदेश प्रदर्शित करुन प्रसिध्द करणे	एस.टी.बसेसच्या दरवाजाच्या उजव्या बाजूचे साईड पॅनलवर २२ x २ फूट आकाराचा संदेश एक महिना अथवा बसतील तेवढे दिवस प्रदर्शित करुन प्रसिध्द करणे. एका बसवर संदेश प्रदर्शित करण्याचा एका महिण्यासाठीचा एकूण खर्च - १)एका साईड पॅनलवर संदेश प्रदर्शित करण्याचे भाडे	६४.०१

		- रु.५५२५/- + संदेश छपाई व लावणे - रु.१०५०/- + १८% जीएसटी - रु.११८३.५० असा एकूण रु.७७५८.५० खर्च याप्रमाणे एकूण ८२५ बसेसवर संदेश प्रदर्शित करणे. सदर काम महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील एसटी बसेसवर संदेश प्रदर्शित करण्यासाठी एकाधिकृत केलेल्या मे.राकेश ॲडव्हर्टायझर्स, मुंबई या संस्थेमार्फत शासन मान्य दरानुसार मंजूर निधीच्या अधीन राहून करून घेण्यात येईल.	
२	राष्ट्रीय वृध्दापकाळ आरोगय शुश्रुषा कार्यक्रम (NPHCE) अंतर्गत बॅनर्स छपाई करुन जिल्हयांना पुरवठा करणे.	**आकार** - ५ फूट x ३ फूट = १५ स्क्वे.फुट **छपाई**- सचित्र, पीव्हीसी मटेरीयल, अडकवण्या - साठी आयलेट सुविधासह. **एकूण संख्या**- ४८६० बॅनर्स प्रति स्क्वे.फुट दर रु.७.१०/- (लावणे व काढणे वगळून) याप्रमाणे १५ स्क्वे.फुट आकाराच्या एका बॅनरसाठी रु.१०६.५०/- इतका खर्च (जीएसटी व सर्व खर्चासहित) शासन निर्णय, सा.प्र.वि. दि.१४.०७.२०१६ नुसार बॅनर्स छपाई करुन पुरवठा करण्यासाठी मे.कल्याणी कार्पोरेशन पुणे ही संस्था नियुक्त करण्यात आली आहे. सदर संस्थेच्या दरानुसार मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे बॅनर्स तयार करून जिल्हयांना पुरवठा करण्यात येईल.	५.१८
३	राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम (NTCP) विषयी संदेश प्रदर्शित करुन प्रसिध्दी करणे	**आकार** - २० फूट x १० फूट = २०० स्क्वे.फुट चार रंगात सचित्र आधुनिक पध्दतीने प्लेक्सव्दारे होर्डींग्जवर संदेश प्रदर्शित करणे **जिल्हा एस.टी.स्टँड वरील एका होर्डींगवर खर्च-**	६९.५९

		प्रति होर्डींग प्रति महिना रु.३६,०००/- + प्रिंटींग चार्जेस रु.४०००/- + मॉटींग चार्जेस रु.१५००/- असे एकूण रु.४१,५००प्रति महिना + १८ टक्के जीएसटी रु७४७०/- असे एकूण सर्व रु.४८९७०/- निवडक जिल्हा मुख्यालयाच्या एस.टी.स्टँडवरील ४८ होर्डीग्जवर संदेश प्रदर्शित करणे. एकूण खर्च रु.४८९७० x ४८= रु.२३,५०,५६०/- **तालुका एस.टी.स्टँड वरील एका होर्डींगवर खर्च**- प्रति होर्डींग प्रति महिणा रु.३०,०००/- + प्रिंटींग चार्जेस रु.४०००/- + मॉटींग चार्जेस रु.१५००/- असे एकूण रु.३५,५००प्रति महिना + १८ टक्के जीएसटी रु. ६३९०/- असे एकूण सर्व रु.४१८९०/- निवडक तालुका मुख्यालयाच्या एस.टी.स्टँडवरील ११० होर्डींग्जवर संदेश प्रदर्शित करणे. एकूण खर्च रु.४१८९० x ११०= रु.४६,०७,९००/- सदर काम महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने एस.टी.स्टँडवरील होर्डींग्जवर संदेश प्रदर्शित करण्यासाठी एकाधिकृत केलेल्या मे.ओम ॲडव्हरटाईझर्स, मुंबई यांचेकडून त्यांचे दरानुसार करुन घेता येईल.	
४	राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत एस.टी.बसेस वर संदेश प्रदर्शित करुन प्रसिध्दी करणे	एस.टी.बसेसच्या दरवाजाच्या उजव्या बाजूचे साईड पॅनलवर २२ x २ फूट आकाराचा संदेश एक महिना अथवा बसतील तेवढे दिवस प्रदर्शित करुन प्रसिध्द करणे. एका बसवर संदेश प्रदर्शित करण्याचा ण्का महिण्यासाठीचा एकूण खर्च - १)एका साईड पॅनलवर संदेश प्रदर्शित करण्याचे भाडे - रु.५५२५/- + संदेश छपाई व लावणे - रु.१०५०/- + १८% जीएसटी - रु.११८३.५० असा एकूण रु.७७५८.५० खर्च याप्रमाणे एकूण ३६० बसेसवर	२७.९४

		संदेश प्रदर्शित करणे. सदर काम महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील एसटी बसेसवर संदेश प्रदर्शित करण्यासाठी एकाधिकृत केलेल्या मे.राकेश ॲडव्हर्टायझर्स, मुंबई या संस्थेमार्फत शासन मान्य दरानुसार मंजूर निधीच्या अधीन राहून करून घेण्यात येईल.	
			१६६.७२

२. अटी व शर्ती -

१) सदर खरेदीसाठी शासननिर्णय उर्जा व कामगार विभाग,उद्योग,क्र-भांखस.२०१४.प्रक्र/८२भाग/III/उद्योग-४.दि,१.१२.२०१६ अन्वये प्रसिध्द केलेल्या सुधारित नियमपुस्तिकेत विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा .एकलस्रोत खरेदीबाबत सदर शासन निर्णयामधील "**शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका**" यात नमूद परिच्छेद क्रमांक ३.२.६ येथील तरतुदीनुसार तसेच विहित कार्यपध्दीस अनुसरून करण्यात यावी .

२) खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specification)संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी) मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश हे कोणत्याही कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) प्रशासकीय मान्यता देतांना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

४) खरेदी करण्यात येणा-या बाबींची पुरवठापुर्व/पुरवठयानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करून उचित व योग्य विर्निदेश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल याची खात्री करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणा-या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (Storage & Distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहित मुदतीत वापर होईल याची दक्षता घेण्यात यावी.

६) सदर खरेदीची द्विरुक्ती (Duplication(होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबवितांना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelince(तंतोतंत पालन करण्यात यावे.

८) शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२,दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला,उपविभाग-दोन मधील अ.क्र.४,नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ मधील अटींची पूर्तता करण्यात यावी.

९) केंद्रीय खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

१०) सदर एजन्सरचे दरपत्रक रद्द झालेले नाही याची खात्री CPC पुढे जाण्यापुर्वी करण्यात यावी.

११) शासकीय कर संबंधीत यंत्रणेकडे जमा केला असल्याची खात्री केल्यानंतरच सेवा पुरवठादारास देयक अदा करण्यात यावे.

३. वर नमूद उपक्रमांसाठीचा खर्च आयईसी पीआयपी सन २०१७-१८ या वर्षात मंजूर केलेल्या निधीमधून भागविण्यात यावा.

४. सदर शासननिर्णय, शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/ २०१३/विनियम भाग-२,दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला,उपविभाग-दोन मधील अ.क्र.४,नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११३०१६०८५५३५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.11.30 20:47:44 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन)आरोग्य सेवा, मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
७. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).